जा.क्र.का.15/वामूदत-2017-18/ 851
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकीय इमारत, तळमजला,पुणे-1
दि. 19 /08/2017.

# आदेश

**विषय :-** सन 2017-18 साठी स्थावर मालमत्तेच्या वार्षिक मूल्य दर तक्त्याबाबत.

संदर्भ :- 1) या विभागाकडील आदेश क्र.का.15/वामुदत 2017-18/414, दि.31/3/2017.
2) शासन पत्र क्र.मुद्रांक-2017/1166/प्र.क्र.236/म-1, दि.16 मे 2017.
3) या विभागाकडील आदेश क्र.का.15/वामूदत-2017-18/574, दि.19/5/2017.
4) शासन पत्र क्र.मुद्रांक-2017/1166/प्र.क्र.236/म-1, दि.19/6/2017.
5) या विभागाकडील आदेश क्र.का.15/वामूदत-2017-18/661, दि.19/6/2017.
6) शासन पत्र क्र.मुद्रांक-2017/1166/प्र.क्र.236/म-1, दि.19/08/2017.

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारीत करणे) नियम, 1995 च्या नियम 4(3) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सन 2017-18 या वर्षाकरिता महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्राच्या स्थावर मालमत्तेच्या वार्षिक मूल्य दर तक्त्यांना मंजूरी प्रदान केली असून, सदर दर तक्ते दि.1 एप्रिल 2017 पासून अंमलात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, संदर्भित शासन पत्र क्र.2 मधील निर्देशानुसार या विभागाकडील संदर्भित पत्र क्र.3 च्या आदेशान्वये मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रातील केवळ जमिनीच्या दरास एक महिना कालावधीकरिता स्थगिती देण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, संदर्भित शासन पत्र क्र.4 मधील निर्देशानुसार या विभागाकडील संदर्भित पत्र क्र.5 च्या आदेशान्वये मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रातील केवळ जमिनीच्या दरास संदर्भित क्र.3 च्या आदेशान्वये दिलेली स्थगिती 3 महिन्यांपर्यंत वाढविण्यात आली होती;

आणि ज्याअर्थी, शासनाने संदर्भित पत्र क्र. 6 मधील निर्देशानुसार मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रातील केवळ जमिनीच्या दरास संदर्भित क्र. 5 वरील आदेशान्वये तीन महिन्यापर्यंत वाढविण्यात आलेली स्थगिती पुढील आदेश होईपर्यंत किंवा एक महिना यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत वाढविण्यात येत आहे.

( अनिल कवडे )
मुख्य नियंत्रक महसुल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :-

1) मा.प्रधान सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग, मंत्रालय मुंबई - 32 यांना माहितीसाठी सादर.
2) वरिष्ठ तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी -
   सदर परिपत्रक e-ASR च्या Home page वर त्वरीत प्रदर्शित करावे, तसेच e-ASR, igrmaharashtra website व I-Sarita मध्ये याबाबतचा टिकर टाकावा. त्याचबरोबर e-ASR मध्ये याप्रमाणे दर दिसतील यासाठी उचित कार्यवाही करावी. सदर वार्षिक मूल्य दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online services या सदराखाली e-ASR या ठिकाणी उपलब्ध करण्यात यावेत.
3) सहसंचालक, नगर रचना,मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
4) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
5) सह नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
6) उपसंचालक नगर रचना, मुंबई प्रदेश, मुल्यांकन, मुंबई
7) सहाय्यक संचालक नगर रचना, मूल्यांकन, कोकण (ठाणे).
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, कोकण.
9) सहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-32.
10) मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई शहर/कुर्ला/अंधेरी/बोरीवली
11) सह जिल्हा निबंधक, ठाणे (शहर)/ठाणे (ग्रामीण)/रायगड/पालघर.